कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/वा.दि.आ/२०२३-२४/११७२
दि. ३१/०८/२०२३

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे "वार्षिक दिन" सोहळा मंगळवार दि. २९ ऑगस्ट २०२३ रोजी इन्स्टिटयूट मिनेझिस ब्रागांझाच्या छोटया सभागृहात संपन्न झाला. मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले तदनंतर शास्त्रीय गायन वादन व नृत्याच्या कार्यक्रमाची सुरुवात तबला सहवादनाने झाली. यामध्ये गुरु श्री. शैलेश गांवकर यांचे शिष्य कु. ऋषीकेश नाईक, कु. कौशल कवळेकर व कु. कौस्तुभ च्यारी यांनी तबला वादनात मत्त ताल पेश केला. त्यांना श्री. चारुदत्त गांवस यांची नगमा साथ लाभली. त्यानंतर गुरु श्री. सुभाष फातर्पेकर यांचे शिष्य कु. गोपिनाथ गावस यांनी संवादिनी वादनातून भिमपलास रागात मध्यलय झपतालातील व दृत तिनतालातील रचना सादर केली त्यांना तबल्यावर श्री. भार्गवराम गर्दे यांची साथ लाभली गुरु श्री. रुपेश गावस यांचे शिष्य कु. अवी परवार यांनी शास्त्रीय गायनातून राग मियाँ मल्हार सादर केला त्यामध्ये त्यांनी विलंबित ख्याल व त्याला जोडून दृत बंदिशीने गायनाची सांगता केली त्यांना तबल्यावर श्री. सुरज मोरजकर व संवादिनीवर श्री. शुभम नाईक यांची साथसंगत लाभली. त्यानंतर गुरु सौ. वरदा बेडेकर यांच्या शिष्याचा वर्षा ऋतुवर आधारीत रचनांवर कथ्थक नृत्याचा कार्यक्रम झाला यामध्ये कु. श्रृती गावस, कु. नवमी नाईक व कु. प्राची मणेरीकर या सहभागी झाल्या होत्या. कथ्थक नृत्यासाठी श्री. पांडुरंग गांवस, श्री. सुरज मोरजकर यांची तबला साथ, श्री. शुभम नाईक यांची संवादिनीसाथ सौ. सम्राज्ञी आईर यांची गायन-साथ व सौ. वरदा बेडेकर यांची पढंतची साथ लाभली. त्यानंतर सौ. मंदिरा तिरोडकर यांच्या शिष्य कु. निधी नाईक शिरोडकर व कु. मंजिरी फुटणकर यांचे भरतनाटयम नृत्य झाले व त्याला जोडून डॉ. सपना नाईक यांच्या शिष्या कु. जान्हवी प्रभु-म्हांबरे, कु. अनुश्री कोली व कु. मुस्कान खानोलकर यांनी भरतनाटयम नृत्य सादर केले. भरतनाटयम नृत्यासाठी सौ. मंदिरा तिरोडकर व डॉ. सपना नाईक यांची नटवंगम साथ तसेच डी. आर. चेथनमुर्ती यांची मृदगंम साथ व डॉ. दिप्ता रुबसुंदरम यांची गायन साथ लाभली. गायन, वादन नृत्याच्या कार्यक्रमानंतर प्रमुख कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमाला व्यासपिठावर प्रमुख पाहुणे म्हणून गोवा राज्याचे कला व संस्कृती व क्रिडा मंत्री

व कला अकादमीचे अध्यक्ष मा. श्री. गोविंद गावडे तसेच खास निमंत्रित म्हणून इन्स्टिटयूट मिनेझीस ब्रागांझाचे अध्यक्ष श्री. दशरथ परब, कला अकादमीचे सदस्य सचीव श्री. विनेश आर्लेकर, प्रशासकीय संचालिका श्रीमती फ्रान्सकीना ऑलीव्हेरा व हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागाचे प्रभारी संचालक श्री. प्रेमानंद आमोणकर उपस्थित होते. सर्वप्रथम श्री. प्रेमानंद आमोणकर यांनी स्वागतपर भाषण केले व मान्यवराचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तदनंतर डॉ. सपना नाईक यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. त्यानंतर सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांचा हस्ते तबला व गायन विषयात सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्याला पुरस्कार प्रदान करण्यात आले. हे पुरस्कार श्रीमती वंदना उर्फ रोहिणी बखले यांनी पुरस्कृत केले होते. त्यांचे वडिल कै. बाळकृष्ण बखले यांच्या नावाने तबल्यासाठी दिला जाणारा पुरस्कार गुरु श्री. शैलेश गांवकर यांचे शिष्य कु. उत्पल अरविंद सायनेकर यांना प्राप्त झाला तर दुसरा पुरस्कार त्याचे गुरु. कै. पं. रत्नकांत रामनाथकर यांच्या नावाने शास्त्रीय गायनासाठी दिला जाणारा पुरस्कार गुरु श्री. सचिन तेली यांची शिष्या कु. मुक्ता संजय मिसर हिला प्राप्त झाला. तद्नंतर कला अकादमी व संगीत केंद्रामधील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्त्रीपतके प्रदान करण्यात आली. तदनंतर सदस्य सचिव श्री. विनेश आर्लेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनंतर इन्स्टिटयूट मिनेझीस ब्रागांझाचे अध्यक्ष श्री. दशरथ परब यांनी आपले विचार मांडले व शेवटी प्रमुख पाहुणे मा. श्री. गोविंद गावडे यांनी आपल्या भाषणातून सर्व विद्यार्थ्यांना बहुमोल असे मागदर्शन केले.

संपुर्ण कार्यक्रमाच्या निवेदनाची बाजु श्री. रुपेश गांवस, सौ. वरदा बेडेकर, सौ. मंदिरा तिरोडकर व श्री. चारुदत्त गांवस यांनी सांभाळली व कार्यक्रमाच्या शेवटी श्री. सचिन तेली यांनी सर्वांचे आभार मानले.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)